# गंगापूर येथे सापडलेल्या विष्णु मूर्ती

**डॉ. शरद उत्तमराव गावंडे**

*इतिहास विभाग प्रमुख, वि. पा. शि. प्र. मं. सं., कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड जि. औरंगाबाद*

औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर या तालुक्याचे मुख्यालय असलेल्या ठिकाणी सापडलेल्या विष्णुच्या मूर्ती सध्या महाराष्ट्र शासनाच्या, पुरातत्व विभागाच्या सोनेरी महल, औरंगाबाद येथील वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आलेल्या आहेत. एकुण सहा मूर्तिंचा मूर्तिशास्त्राच्या आधारे अभ्यास करून त्यांची ओळख करण्यात आली आहे. विष्णुच्या हातात दक्षिणध:करक्रमाने गदा, पद्म, शंख, चक्र ही आयुधे असतात. विष्णुच्या चोवीस रूपातील मूर्तिंच्या हातातील या आयुधांचा क्रम बदललेला असतो. त्यापैकी गोविंद, माधव रूपातील प्रत्येकी एक व मधुसूदन रूपातील दोन मूर्ती तसेच साधारण विष्णुच्या दोन मूर्ती येथे आहेत. येथील मूर्तिंमध्ये दशावतारातील मूर्ती नाही. विष्णुच्या चोविस रूपातील मूर्ती वेगवेगळ्या ठिकाणी आढळून येतात. इतरत्र असलेल्या विष्णुमूर्ती आणि या संग्रहालयातील मूर्ती यांच्या घडणीत फरक आढळून येत नाही परंतु यासाठी वापरलेला दगड मात्र इतर विष्णु मूर्तिंच्या तुलनेत साधारण वाटतो.

**प्रास्ताविक :—**

मूर्तिशिल्पांचा अभ्यास करताना भारताच्या सांस्कृतिक प्रवाहात विविध धर्मांचा झालेला उगम लक्षात घ्यावा लागतो. मानवी मनावर, श्रद्धेवर या धर्माचा पगडा पडू लागलेला होता. या विविध धर्मांनी जनसामान्य साधकांसाठी धर्म, तत्त्वविचार, शिकवण, सांसारिक नितिसूत्रे अनेक कलांच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सुरुवात केली. या धर्माने दिलेल्या प्रेरणेनेच शिल्पकला, स्थापत्यकला, मूर्तिकला, चित्रकला, साहित्य, तत्त्वज्ञान इत्यादी कलात्मक अविष्काराचा उदय झाला. भारतीय धर्मांनी देवतांचे वर्णन प्रामुख्याने साहित्यात केलेले आढळते. भारतीयांनी देवतांचे सादरीकरण करण्यासाठी त्याचे चित्रीकरण आणि शिल्पीकरण हे प्रस्तरात केले. यातून भारतीय श्रद्धा, आस्था व शिल्पकारांच्या निर्मितीशक्ती यांच्या सुंदर समन्वयाने भारतीय शिल्पकला विकसित होऊ लागली. धर्माशी निगडीत मूर्तिकलेचे स्वरूप ठरू लागले. प्राचीन मिथ्यके, कथा, श्रद्धा, आस्था यांचे शिल्पीकरण मूर्तिकलेत होऊ लागले. इथल्या दगडांनी प्राचीन भारताचा गौरवशाली इतिहास जोपासला आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर या तालुक्याचे मुख्यालय असलेल्या ठिकाणी विष्णुच्या मूर्ती सापडलेल्या आहेत. या सर्व मूर्ती सध्या महाराष्ट्र शासनाच्या, पुरातत्व विभागाच्या सोनेरी महल, औरंगाबाद येथील वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आलेल्या आहेत. या मूर्तिंचा अभ्यास या संशोधन लेखातून मांडण्यात आला आहे.

देवतांच्या मूर्ती या मंदिरांवर व इतरत्र स्वतंत्र मूर्तिही आढळतात. मूर्तिंचा अभ्यास करताना मूर्तिकामाच्या मांडणीत काही संकेत पाळलेले दिसतात. भिंतीच्या क्षिप्त भागावर देवदेवता, सुरसुंदरी यांच्या मूर्ती आहेत तर उत्क्षिप्त भागावर (आत गेलेल्या सावलीतील भागांवर) व्याल व गण कोरलेले आहेत. मंदिरांच्या द्वारशाखांवर कोरीव काम आहे. नावाला जरी ही द्वारशाखा असली तरी प्रत्यक्षात मात्र तिचा उपयोग मूर्तिकलेच्या विविध छटा प्रकट करण्यासाठीच केलेला आहे. किंबहुना ते मूर्तिकलेचे अंग बनलेले आहे.

महाराष्ट्रातील मूर्तिशिल्पात मानवी व प्राणी प्रतिमा आढळतात. डॉ. गो. ब. देगलुरकर यांनी महाराष्ट्रातील मूर्तिशिल्पाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे[१]—

१) मानव व देवदेवता यांचे शिल्प

२) प्राणी शिल्प

३) सजावटीसाठी असलेले शिल्प

पहिल्या प्रकारात अ) देव आणि देवी, ब) मानवी शिल्प असे उपप्रकार केले आहेत.

गंगापूर येथे सापडलेल्या या मूर्तिंचा अभ्यास पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे.

**विष्णु देवता :—**

विष्णु ही लोकप्रिय देवता आहे. सृष्टीच्या तीन स्थिती म्हणजे उत्पत्ती, स्थिती आणि लय, त्यापैकी स्थिती देवता म्हणून विष्णूस मान्यता आहे. सरंक्षक देवता म्हणून ती अधिक प्रसिद्ध आहे. ती लोकांचे संरक्षण करते, संकटमुक्त करते. हे विष्णुच्या अवतार कार्यावरून कळते. विष्णु

लोकांना संकटातून मुक्त करीत असल्यामुळे तो सृष्टीचा पालनकर्ता आहे; सूर्य हे त्याचे चिन्ह व गरुड हे त्याचे वाहन आहे.[२] शंख, चक्र, गदा, पद्म, धनुष्य, श्रीवत्स, कौस्तुभ, वैजयंती, किरीट आणि कुंडले ही विष्णुची आयुधे व अलंकरणे होत.

महाराष्ट्रात आढळणाऱ्या विष्णुमूर्तिंचे वर्गीकरण डॉ. देगलुरकरांनी पुढील तीन गटात केले आहे.[३]

१. विष्णुच्या चोवीस रूपातील मूर्ती
२. विष्णुच्या दशावतारातील मूर्ती
३. विष्णुच्या इतर रूपातील मूर्ती

पहिल्या गटात : केशव, नारायण, माधव, विष्णु, त्रिविक्रम, श्रीधर, वासुदेव, ऋषिकेश, पुरुषोत्तम, पद्मनाभ, अनिरूद्ध, अच्युत, उपेंद्र, जनार्दन, हरी आणि श्रीकृष्ण यांचा समावेश होतो. विष्णुचे एकूण चोवीस प्रकार मूर्तिविज्ञानात आणि धर्मशास्त्रात कल्पिले गेले आहेत. केशव व नारायण रूपात चार हात असतात. इतर रूपात दोन, चार, सहा, आठ किंवा अधिक हात असतात. विष्णुच्या प्रसिद्ध चोवीस नावांशिवाय त्यास वैकुंठ, स्वभू, दैत्यारि, पुंडरीकाक्ष, गरुडध्वज, विश्वंभर इत्यादी नावे आहेत. विष्णुच्या हातात दक्षिणध:करक्रमाने गदा, पद्म, शंख, चक्र ही आयुधे असतात. विष्णुच्या चोवीस रूपातील मूर्तिंच्या हातातील या आयुधांचा क्रम बदललेला असतो. मध्यकाळात शंख, चक्र, गदा व पद्म यांच्या स्थानपरिवर्तनाच्या आधारावर विष्णुच्या चोवीस प्रकारच्या मूर्ती घडविल्या जाऊ लागल्या.[४] येथे असलेल्या मूर्ती या विष्णुच्या चोवीस रूपातील तसेच विष्णुच्या साधारण रूपातील मूर्ती आहेत.

**१) गंगापूर येथील विष्णु मूर्ती क्र. १ :–**

गंगापूर येथे सापडलेली विष्णु मूर्ती सध्या महाराष्ट्र शासन, राज्य पुरातत्व विभागाच्या सोनेरी महल, औरंगाबाद येथील वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असलेल्या गंगापूर येथे विष्णुच्या एकुण सहा मूर्ती सापडलेल्या आहेत. ही मूर्ती स्थानक समभंग स्थितीत आहे. विष्णुची ही मूर्ती चतुर्भुज असून वरच्या उजव्या हातात गदा आहे खालचा हात तुटलेला आहे. वरच्या डाव्या हातात चक्र आहे तर खालच्या हातात शंख आहे. कानात कुंडले आहेत. डोक्याच्या मागे प्रभावळ आहे. विष्णुने सुंदर वस्त्रे परिधान केलेली आहेत. विष्णुच्या डाव्या हाताखाली चवरी ढाळणारी स्त्री आहे तर उजव्या हाताखाली हात जोडलेला गरुड आहे. ही मूर्ती १२ व्या – १३ व्या शतकातील आहे.

**२) गंगापूर येथील विष्णु मूर्ती क्र. २ :–**

गंगापूर येथे विष्णुची आणखी एक मूर्ती सापडली असून ती सुद्धा या वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. ही मूर्तिसुद्धा स्थानक समभंग स्थितीत आहे. विष्णुची ही मूर्ती चतुर्भुज असून वरच्या उजव्या हातात शंख आहे खालचा हात तुटलेला आहे. वरच्या डाव्या हातात गदा असून खालचा हात तुटलेला आहे. या मूर्तिच्याही डोक्याच्या मागे प्रभावळ आहे. विष्णुच्या डाव्या हाताखाली लक्ष्मी आहे तर उजव्या हाताखाली हात जोडलेला गरुड आहे. ही मूर्तिसुद्धा १२ व्या – १३ व्या शतकातील आहे. गंगापूरच्या मूर्ती क्र. १ पेक्षा या मूर्तिची झीज झालेली आहे.

**३) गंगापूर येथील गोविंद रूपातील विष्णु मूर्ती :–**

गंगापूर येथे विष्णुची तिसरी मूर्ती सापडली असून ती सुद्धा या वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. ही मूर्तिसुद्धा स्थानक समभंग स्थितीत आहे. विष्णुची ही मूर्ती चतुर्भुज असून वरच्या उजव्या हातात चक्र आहे तर खालच्या हातात पद्म आहे. वरच्या डाव्या हातात गदा असून खालच्या हातात शंख आहे. चगशंप (चक्र, गदा, शंख व पद्म) या क्रमाने आयुधे असल्यामुळे नारदीय संहितेनुसार ही विष्णुच्या गोविंद रूपातील मूर्ती आहे.[५] या मूर्तिच्या डोक्याच्या मागे प्रभावळ असून कानात लांब कुंडले आहेत. विष्णुच्या डाव्या हाताखाली चवरी ढाळणारी स्त्री आहे तर उजव्या हाताखाली हात जोडलेला गरुड आहे. ही मूर्तिसुद्धा १२ व्या – १३ व्या शतकातील आहे.

**४) गंगापूर येथील माधव रूपातील विष्णु मूर्ती :–**

गंगापूर येथे विष्णुची आणखी एक चौथी मूर्ती सापडली असून ती या वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. ही मूर्तिसुद्धा स्थानक समभंग स्थितीत आहे. विष्णुची ही मूर्ती चतुर्भुज असून वरच्या उजव्या हातात चक्र आहे खालच्या हातात शंख आहे. वरच्या डाव्या हातात गदा असून खालच्या हातात पद्म आहे. चगपशं (चक्र, गदा, पद्म व शंख) या क्रमाने आयुधे असल्यामुळे नारदीय संहितेनुसार ही विष्णुची माधव रूपातील मूर्ती आहे.[६] या मूर्तिच्याही डोक्याच्या मागे प्रभावळ आहे. विष्णुच्या डाव्या हाताखाली लक्ष्मी आहे तर

उजव्या हाताखाली हात जोडलेला गरुड आहे. ही मूर्तिसुद्धा १२ व्या – १३ व्या शतकातील आहे.

**५) गंगापूर येथील मधुसूदन रूपातील विष्णु मूर्ती क्र. १:–**
गंगापूर येथे विष्णुची आणखी एक पाचवी मूर्ती सापडली असून ती या वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. ही मूर्तिसुद्धा स्थानक समभंग स्थितीत आहे. विष्णुची ही मूर्ती चतुर्भुज असून वरच्या उजव्या हातात चक्र आहे खालच्या हातात गदा आहे. वरच्या डाव्या हातात शंख असून खालच्या हातात पद्म आहे. चशंपग (चक्र, शंख, पद्म व गदा) या क्रमाने आयुधे असल्यामुळे परमेश्वर संहितेनुसार ही विष्णुची मधुसूदन रूपातील मूर्ती आहे.[७] या मूर्तिच्याही डोक्याच्या मागे प्रभावळ आहे. विष्णुच्या डाव्या हाताखाली चवरी ढाळणारी स्त्री आहे तर उजव्या हाताखाली हात जोडलेला गरुड आहे. ही मूर्तिसुद्धा १२ व्या – १३ व्या शतकातील आहे.

**६) गंगापूर येथील मधुसूदन रूपातील विष्णु मूर्ती क्र. २:–**
गंगापूर येथे विष्णुची आणखी एक सहावी मूर्ती सापडली असून ती सध्या महाराष्ट्र शासन, राज्य पुरातत्व विभागाच्या सोनेरी महल, औरंगाबाद येथील वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. ही मूर्तिसुद्धा स्थानक समभंग स्थितीत आहे. विष्णुची ही मूर्ती चतुर्भुज असून वरच्या उजव्या हातात चक्र आहे खालच्या हातात गदा आहे. खालचा अर्धा हात तुटलेला आहे. गदा अर्धी तुटलेली आहे. वरच्या डाव्या हातात शंख असून खालच्या हातात पद्म आहे. चशंपग (चक्र, शंख, पद्म व गदा) या क्रमाने आयुधे असल्यामुळे परमेश्वर संहितेनुसार ही विष्णुची मधुसूदन रूपातील मूर्ती आहे.[८] या मूर्तिच्याही डोक्याच्या मागे प्रभावळ आहे. विष्णुच्या डाव्या हाताखाली लक्ष्मी आहे तर उजव्या हाताखाली हात जोडलेला गरूड आहे. ही मूर्ती १२ व्या – १३ व्या शतकातील आहे.

**निष्कर्ष :–**
औरंगाबाद जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विष्णुच्या मूर्ती सापडतात परंतु एकही विष्णुचे मंदिर नाही. परंतु इतर देवतांच्या मंदिराच्या बाह्यांगावर व मंदिरांच्या परिसरात विष्णुच्या मूर्ती आहेत. या जिल्ह्यात विष्णुच्या दशावतारातील व चोविस रूपातील मूर्ती आहेत. गंगापूर येथे एकुण सहा विष्णुच्या मूर्ती सापडलेल्या आहेत. त्यांचा मूर्तिशास्त्राच्या आधारे अभ्यास केला असता त्यापैकी गोविंद व माधव रूपातील प्रत्येकी एक व मधुसूदन रूपातील दोन मूर्ती तसेच साधारण विष्णुच्या दोन मूर्ती आहेत. विष्णुच्या चोविस रूपातील मूर्ती वेगवेगळ्या ठिकाणी आढळून येतात. इतरत्र असलेल्या विष्णुमूर्ती आणि या संग्रहालयातील मूर्ती यांच्या घडणीत फरक आढळून येत नाही परंतु यासाठी वापरलेला दगड मात्र इतर विष्णु मूर्तिंच्या तुलनेत साधारण वाटतो. म्हणून या मूर्तिंचे जतन होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

## संदर्भ :–

[१] Deglurkar G. B, Temple Architecture and Sculpture of Maharashtra, First Edition, Registrar, Nagpur University Nagpur, 1974, P. 111.
[२] खरे ग. ह., मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, १९३९, पृ. १८.
[३] Deglurkar G. B, Temple Architecture and Sculpture of Maharashtra, Nagpur, 1974, P. 132.
[४] जोशी नि. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७९,पृ.१३.
[५] जोशी नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, प्रसाद प्रकाशन पुणे, द्वितिय आवृत्ती, २०१३, पृ. १०२.
[६] कित्ता पृ. १०२.
[७] कित्ता पृ. १०३.
[८] कित्ता पृ. १०३.